# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २२/०३/२०२२ (मंगळवार)**

**(सायंकाळ)**

---

### जबरी संभोग

**पो.स्टे. सावनेर :-** दिनांक २१/०३/२०२२ चे ०८:०० वा. ते १४.०० वा. चे सुमारास फिर्यादी/पीडित वय १८ वर्ष ही कॉलेज मध्ये शिकत असुन रोज ये जा करते. दि. ११/३/२०२२ रोजी कळमेश्वर बस स्टॉप येथे आरोपी नामे- विक्की उर्फ जितेन्द्र कोल्हे रा. कळमेश्वर याच्याशी ओळख झाली. त्याने तीला ग्रे रंगाची कार क्र एमएच- ४० ६८ (पुर्ण नंबर माहीत नाही) मध्ये बसवून मोबाईल नबंरची देवान घेवान केली. तसेच तिला म्हणाला की, 'माझे सोबत रिलेशन मध्ये येशील का, माझी र्गल फ्रेड बन' त्यावर त्याने तिला सावनेरला सायंकाळी ०७.३० वा. आणून सोडले व तेव्हा पासून तो फिर्यादीशी व्हॉटस अॅप वर बोलत होता. त्यानंतर दि. २१/३/२०२२ रोजी सकाळी ०८.०० वा. सावनेर येथुन आरोपी फिर्यादी ला कार घेवून घ्यायला आला व तेथून तिला काटोल रोड कडे एका सूनसान जागी एका घरामध्ये घेवून जावून बळजबरीने जबरी संभोग केला. तसेच आरोपीने तिला शिवीगाळ केली त्यावर तिला घेवून पुन्हा सावनेर कडे निघाला असतांना ब्राम्हणी फाटा येथे एका मेडीकल मधून त्यांनी गोळी आणली व फिर्यादीला म्हणाला 'ती गोळी घे नाही खाशील तर प्रेगनेंट होवून जाशील' अशी धमकी दिली. यानंतर आरोपीने ती गोळी तिला खाउ घातली मग दुपारी ०२.०० वा. त्याने फिर्यादीला सावनेर येथे आणून सोडले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३६६, ३७६, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि सोनाली रासकर मो.क्र. ९०८२१९६०८० या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**